महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासं/रचका/न.क्र.१-ब/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

# सुधारपत्र क्र. ५३ दिनांक २०/०२/२०२३

**(म.रा.वि.वि.कं.मर्या., कर्मचारी सेवाविनियम - २००५)**

**विषय: राज्य शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासकीय कामकाजास्तव पथिकाश्रम (हॉटेल) वास्तव्यासाठी देय असलेल्या दैनिक भत्याच्या दरांत सुधारणा करणेबाबत.**

पूर्वीच्या म.रा.वि.मंडळाच्या विभाजनानंतर अस्तित्वात आलेल्या महावितरण कंपनीमध्ये कार्यरत अधिकारी व कर्मचारी यांचेकरिता शासनाने जारी केलेल्या अधिसूचनेमधील तरतुदीनुसार मंडळाचे सेवाबाबतचे विनियम कंपनीने अंगिकृत केलेले आहे. याच अनुषंगाने कंपनीमधील कार्यरत अधिकारी व कर्मचारी हे कंपनीच्या कामाकरिता दौऱ्यावर असताना म.रा.वि.वि.कं.मर्या.कर्मचारी सेवाविनियम २००५ च्या विनियम क्र.६१(ख) अनुसार दैनिक भत्ता व दौऱ्यावर असताना पथिकाश्रम (हॉटेल) मधील वास्तव्याकरिता केलेल्या खर्चाची प्रतिपूर्ती मिळण्यास पात्र आहेत.

२. महाराष्ट्र शासन, वित्त विभाग यांचा शासन निर्णय क्र.प्रवास-२०२२/प्र.क्र.०३/२०२२/सेवा-५ दि.०७.१०.२०२२ अन्वये राज्य शासकीय व इतर पात्र अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासकीय कामकाजास्तव दौऱ्यावर असतांना फक्त दिल्ली, मुंबई, कोलकाता, चेन्नई, बंगळुरु व हैद्राबाद शहरातील पथिकाश्रम (हॉटेल) मध्ये वास्तव्य केल्यास देय असलेल्या दैनिक भत्त्याच्या दरात सुधारणा करण्यात आली आहे. सदर दि.०७.१०.२०२२ रोजीच्या शासन निर्णयामधील तरतुदींच्या धर्तीवर सक्षम अधिकारी यांनी सेवाविनियमाचे सुधारपत्र क्र.३२ दि.१०.०७.२०१३ अन्वये लागू केलेल्या दरामध्ये खालीलप्रमाणे वाढ करण्यास मंजूरी प्रदान केलेली आहे.

**सेवाविनियम क्र.६१(ख):**

| अ.क्र. | वेतनश्रेणी | दिल्ली, मुंबई, कोलकाता, चेन्नई, बंगळुरु व हैद्राबाद — प्रस्तावित दर (रुपये) | |
|---|---|---|---|
| | | पथिकाश्रम (हॉटेल) मध्ये वास्तव्य केल्यास देय असलेली प्रतिपूर्ती | भोजन व संकीर्ण खर्च |
| १ | रु.८१६९५-३१४५-९७४२०-३५७०-१७५९६० किंवा त्याहून वरच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे अधिकारी/कर्मचारी | रु.७५००/- पर्यंत प्रतिदिन | रु.१२००/- प्रतिदिन पेक्षा जास्त नाही |
| २ | ६३७७०-२५१५-७६३४५-२७३०-१४१८६५ किंवा त्याहून वरच्या परंतु रु.८१६९५-३१४५-९७४२०-३५७०-१७५९६० पेक्षा खालच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे अधिकारी/कर्मचारी | रु.४५००/- पर्यंत प्रतिदिन | रु.१०००/- प्रतिदिन पेक्षा जास्त नाही |
| ३ | ४२३२५-१७४०-५१०२५-१८३०-६९३२५-२०६०-१०८४६५ किंवा त्याहून वरच्या परंतु ६३७७०-२५१५-७६३४५-२७३०-१४१८६५पेक्षा खालच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे कर्मचारी | रु.२२५०/- पर्यंत प्रतिदिन | रु.८००/- प्रतिदिन पेक्षा जास्त नाही |
| ४ | ३७३४०-१६७५-४५७१५-१७४०-६३११५-१८३०-१०३३७५ पेक्षा खालच्या वेतनश्रेणीमध्ये वेतन घेणारे कर्मचारी | रु.१०००/- पर्यंत प्रतिदिन | रु.५००/- प्रतिदिन पेक्षा जास्त नाही |

टिप:-

क) पथिकाश्रम वास्तव्याची प्रतिपूर्ती:- पथिकाश्रम वास्तव्याची प्रतिपूर्तीची मागणी करतांना पथिकाश्रमाची पावती जोडणे आवश्यक राहील. उपरोक्त तक्त्यात नमूद करण्यात आलेल्या दरांपेक्षा कमी शुल्क आकारणाऱ्या पथिकाश्रम मध्ये वास्तव्य करण्याचा कर्मचाऱ्यांनी प्रयत्न करणे आवश्यक राहील.

ख) प्रवास व दैनिक भत्त्याची प्रतिपूर्ती:- प्रवास भत्त्याची व दैनिक भत्त्याची प्रतिपूर्ती ही सेवाविनियमाची सुधारपत्र क्र.२४ दि.०२.०४.२०१२ सोबत शुध्दीपत्रक क्र.१८४५९ दि.०३.०७.२०१२ अन्वये नमूद केल्याप्रमाणे अनुज्ञेय राहील.

ग) भोजन व संकीर्ण खर्च:-
i) प्रत्येक भोजन व संकीर्ण खर्चासाठी स्वतंत्र प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहणार नाही. त्याऐवजी उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे एकत्रितपणे प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.
ii) बैठक / चर्चा / प्रशिक्षण इ. साठी दौरा असतांना जर जेवण आयोजकातर्फे पुरविण्यात आले असेल तर अशा वेळी वेगळी प्रतिपूर्ती मंजूर केली जाणार नाही.
iii) सदर प्रतिपूर्ती ही खाली दर्शविलेल्या तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे अधिकारी व कर्मचाऱ्याचा मुख्यालयापासुन अनुपस्थित असलेल्या कालावधीनुसार विनियमित करुन त्याप्रमाणे प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

**कालावधीची मर्यादा दर्शविणारा तक्ता :**

| मुख्यालयापासून अनुपस्थिती | प्रतिपूर्तीची मर्यादा |
|---|---|
| मुख्यालयापासून ६ तासांपेक्षा कमी कालावधीसाठी अनुपस्थिती | उपरोक्त तक्त्यातील मर्यादेच्या ३० टक्के रक्कम अनुज्ञेय |
| मुख्यालयापासून ६ ते १२ तास कालावधीसाठी अनुपस्थिती | उपरोक्त तक्त्यातील मर्यादेच्या ७० टक्के रक्कम अनुज्ञेय |
| मुख्यालयापासून १२ तासांपेक्षा जास्त कालावधीसाठी अनुपस्थिती | उपरोक्त तक्त्यातील मर्यादेच्या १०० टक्के रक्कम अनुज्ञेय |

घ) मुख्यालयापासून अनुपस्थिती ही मध्यरात्री पासून ते मध्यरात्री पर्यंत गणण्यात येईल. तसेच दैनिक भत्ता मंजूर करण्यासंदर्भातील सेवाविनियमाची सु.प.क्र.२४ दि.०२.०४.२०१२ सोबत शुध्दीपत्रक क्र.१८४५९ दि.०३.०७.२०१२ मधील अन्य अटी कायम राहतील. सुधारीत दर सदर विषयी दुरुस्ती चिठ्ठी निर्गमित झालेल्या दिनांकापासून कंपनी अंतर्गत अंमलात आणण्यात येतील.

३. सदर सुधारपत्र कंपनीच्या e-library वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

सोबत: शासन निर्णय दि.०७.१०.२०२२ जोडले आहे.

(भूषण कुलकर्णी)
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

**प्रत सविनय सादर:**
१) संचालक (संचलन)/ (वित्त)/ (वाणिज्य)/ (प्रकल्प)/ (मासं) म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
२) कार्यकारी संचालक (मासं) /(सुवअं)/ (वित्त)/ (महसूल व देयके),म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.
३) सह व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद/ कल्याण.
४) प्रादेशिक संचालक, म.रा.वि.वि.कं.मर्या. प्रादेशिक कार्यालय पुणे/ नागपूर.

**प्रत सस्नेह रवाना:**

१) मुख्य महाव्यवस्थापक (तां/आ)/ (सांघिक वित्त)/ (अंतर्गत लेखा परिक्षण) / (सांघिक लेखा) / (माहिती तंत्रज्ञान) / मुख्य विधी अधिकारी/ मुख्य तपास अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

२) मुख्य महाव्यवस्थापक (प्रवसु) म.रा.वि.वि.कं.मर्या.,नाशिक.

३) मुख्य अभियंता (स्थापत्य), स्थापत्य परिमंडल, म.रा.वि.वि.कं.मर्या., मुंबई.

४) मुख्य अभियंता, म.रा.वि.वि.कं.मर्या. परिमंडळ कार्यालय (सर्व)

**प्रत रवाना:**

१) महाव्यवस्थापक (मासं)/ (मासं-मासंव्यप्र) / (नियोजन), म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी/ मुख्य जनसंपर्क अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

३) मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांचे विशेष कार्यकारी अधिकारी, म.रा.वि.वि.कं.मर्या.,सांघिक कार्यालय, मुंबई.

**राज्य शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना शासकीय कामकाजास्तव हॉटेल वास्तव्यासाठी देय असलेल्या दैनिक भत्त्याच्या दरांत सुधारणा करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**शासन निर्णय, क्रमांकः प्रवास-२०२२ /प्र.क्र.०३ /२०२२/सेवा- ५**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ०७ ऑक्टोबर, २०२२

वाचा-

**१) शासन निर्णय, क्रमांक: प्रवास-१०११/प्र.क्र.२/सेवा-५, दि.३ मार्च, २०१०**
**२) शासन निर्णय, क्रमांक: प्रवास-१०११/प्र.क्र.२२/सेवा-५, दि.२७ डिसेंबर,२०११**
**३) शासन निर्णय, क्रमांक : प्रवास-१०११/प्र.क्र.२२/सेवा-५, दि. १२ जानेवारी,२०१२.**
**४) शासन निर्णय, क्रमांक : प्रवास-१०१३/प्र.क्र.३/सेवा-५, दि.०२ मे २०१३.**

प्रस्तावना -

सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने राज्य शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना देय असलेल्या प्रवास व दैनिक भत्त्याच्या दरांत उपरोक्त शासन निर्णय दि. ३ मार्च,२०१० अन्वये सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. सदर शासन निर्णयातील परिच्छेद ९ येथील तक्ता क्र. “ब” नुसार अनुसूचित दर आकारणाऱ्या हॉटेलमधील वास्तव्याकरीता विहीत केलेल्या दैनिक भत्त्याच्या दरांत उपरोक्त दि.०२. मे, २०१३ येथील शासन निर्णयानुसार सुधारणा केलेल्या आहेत. तथापि शासकीय दौऱ्यावरील अधिकारी/कर्मचाऱ्यांना दिल्ली, मुंबई, कोलकाता, चेन्नई, बंगळुरू व हैद्राबाद शहरांतील अनुसुचित दर आकारणाऱ्या हॉटेलमध्ये वास्तव्य केल्यास देय असलेल्या दैनिक भत्त्यातून दैनंदिन खर्च भागविणे शक्य होत नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. ही बाब विचारात घेता शासन निर्णय दि. ०२ मे, २०१३ अन्वये विहित केलेल्या दैनिक भत्त्याच्या (हॉटेलमधील वास्तव्य खर्च आणि भोजन व संकीर्ण खर्च) दरांत केंद्र शासनाच्या सातव्या वेतन आयोगातील दि.१३ जुलै, २०१७ रोजीच्या कार्यालयीन आदेशानुसार सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

राज्य शासकीय व इतर पात्र अधिकारी/कर्मचाऱ्यांना शासकीय कामकाजास्तव दौऱ्यावर असतांना दिल्ली, मुंबई, कोलकाता, चेन्नई, बंगळुरु व हैद्राबाद शहरातील हॉटेलमध्ये वास्तव्य केल्यास देय असलेल्या दैनिक भत्त्याच्या दरांत पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत:-

| अ. क्र. | अधिकारी/कर्मचारी सातव्या वेतन आयोगानुसार धारण करीत असलेला वेतनस्तर | दिल्ली, मुंबई, कोलकाता, चेन्नई, बंगळुरु व हैद्राबाद | |
|---|---|---|---|
| | | हॉटेलमध्ये वास्तव्य केल्यास देय असलेली प्रतिपूर्ती | भोजन व संकीर्ण खर्च |
| १. | एस-३० व त्याहून अधिक | रु.७५००/- पर्यंत प्रतिदिन | रू. १२००/- प्रतिदिन पेक्षा जास्त नाही |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | एस-२५ ते एस-२९ | रू. ४५००/- पर्यंत प्रतिदिन | रू. १०००/- प्रतिदिन पेक्षा जास्त नाही |
| ३. | एस-२० ते एस-२४ | रू. २२५०/- पर्यंत प्रतिदिन | रू. ८००/- प्रतिदिन पेक्षा जास्त नाही |
| ४. | एस-१९ व त्यापेक्षा कमी | रू. १०००/- पर्यंत प्रतिदिन | रू. ५००/- प्रतिदिन पेक्षा जास्त नाही |

१.) हॉटेल वास्तव्याची प्रतिपूर्ती :- हॉटेल वास्तव्याची प्रतिपूर्तीची मागणी करतांना हॉटेलची पावती जोडणे आवश्यक राहील. उपरोक्त तक्त्यात नमूद करण्यात आलेल्या दरांपेक्षा कमी शुल्क आकारणाऱ्या हॉटेलमध्ये वास्तव्य करण्याचा कर्मचाऱ्यांनी प्रयत्न करणे आवश्यक राहील.

२.) प्रवास भत्त्याची प्रतिपूर्ती :- प्रवास भत्त्याची प्रतिपूर्ती ही वित्त विभागाच्या दि.०३ मार्च २०१० रोजीच्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे अनुज्ञेय राहील.

३.) भोजन व संकीर्ण खर्च :- प्रत्येक भोजन व संकीर्ण खर्चासाठी स्वतंत्र प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहणार नाही. त्याऐवजी उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे एकत्रितपणे प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील. सदर प्रतिपूर्ती ही खाली दर्शविलेल्या तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे मुख्यालयापासून अनुपस्थित असलेल्या कालावधीनुसार विनियमित करुन त्याप्रमाणे प्रतिपूर्ती अनुज्ञेय राहील.

कालावधीची मर्यादा दर्शविणारा तक्ता

| मुख्यालयापासून अनुपस्थिती | प्रतिपूर्तीची मर्यादा |
|---|---|
| मुख्यालयापासून ६ तासांपेक्षा कमी कालावधीसाठी अनुपस्थिती | उपरोक्त तक्त्यातील मर्यादेच्या ३० टक्के रक्कम अनुज्ञेय |
| मुख्यालयापासून ६ ते १२ तास कालावधीसाठी अनुपस्थिती | उपरोक्त तक्त्यातील मर्यादेच्या ७० टक्के रक्कम अनुज्ञेय |
| मुख्यालयापासून १२ तासांपेक्षा जास्त कालावधीसाठी अनुपस्थिती | उपरोक्त तक्त्यातील मर्यादेच्या १०० टक्के रक्कम अनुज्ञेय |

मुख्यालयापासून अनुपस्थिती ही मध्यरात्री पासून ते मध्यरात्री पर्यंत गणण्यात येईल.

तसेच दैनिक भत्ता मंजूर करण्यासंदर्भातील वरील १) येथील शासन निर्णय दि. ३ मार्च,२०१० मधील अन्य अटी कायम राहतील. सुधारीत दर सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

सदर प्रतिपूर्ती ही केवळ दिल्ली, मुंबई, कोलकाता, चेन्नई, बंगळुरू व हैद्राबाद या शहरात शासकीय कामकाजास्तव दौऱ्यावर असतांना हॉटेलमध्ये वास्तव्य केल्यासच अनुज्ञेय राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२१००७११५३१५६६०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PATIL PRASHANT VINAYAKRAO

Digitally signed by PATIL PRASHANT VINAYAKRAO
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2b1bad66664b1e11e3bf66db1d526143e814db5f8c505422af66a5628314537e, pseudonym=52A6F57E50F36E268CFB25B4597BB272A28E8E8C, serialNumber=9524CAB2D5A858B4A01FF72F5CAE5FDDC4F8C964F3AFC6B6249294AD88EC870D, cn=PATIL PRASHANT VINAYAKRAO
Date: 2022.10.07 12:00:20 +05'30'

**( प्र. वि. पाटील )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

| | |
|---|---|
| राज्यपालांचे सचिव<br>मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव<br>उपमुख्यमंत्री यांचे सचिव<br>सर्व मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव<br>मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद / विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई<br>सर्व सन्माननीय विधानसभा, विधान परिषद व संसद सदस्य<br>मंत्रालयीन सर्व विभाग<br>सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव मंत्रालय, मुंबई<br>सचिव, मा.सभापती, विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई<br>सचिव, मा.अध्यक्ष, विधान सभा, विधानमंडळ, मुंबई<br>मंत्रालयीन सर्व विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख | निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई<br>सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,<br>लेखा अधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद.<br>संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई,<br>विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,<br>ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.<br>बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई १<br>भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं. १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक,नरिमन पॉईंट , मुंबई २०<br>भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, |

| | |
|---|---|
| प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा),मुंबई.<br>प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा),मुंबई.<br>सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई.<br>सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.<br>प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई.<br>मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई<br>आयुक्त राज्य माहिती आयोग,(सर्व)<br>सचिव राज्य निवडणूक आयोग,मुंबई.<br>प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/ औरंगाबाद.<br>महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे<br>सर्व विभागीय आयुक्त.<br>सर्व जिल्हाधिकारी<br>सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.<br>महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.<br>महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई<br>महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर<br>महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर<br>सिनियर रिसर्च ऑफिसर, पे-रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय, (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली,<br>संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई<br>अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई<br>संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, मुंबई,<br>सहसंचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर. | ३१४,राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड,मुंबई ४<br>भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई १३<br>इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई २५<br>नॅशनलिस्ट काँग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई २१<br>शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई २८<br>वित्त विभागातील सर्व कार्यासने<br>निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-३) |